सकाळ

# शिरोळ येथे १ फेब्रुवारीला साहित्य संमेलनाचे आयोजन

सकाळ वृत्तसेवा

शिरोळ, ता. २२ जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष व शिरोळ तालुक्याचे माजी आमदार, दिनबंधू दलितमित्र दिनकरराव यादव यांच्या स्मृतिदिनानिमित्त १ फेब्रुवारी रोजी साहित्य संमेलन होणार आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून, शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागाचे प्रमुख व ज्येष्ठ समिक्षक डॉ. रणधीर शिंदे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती स्वागताध्यक्ष जि. प. सदस्य दलितमित्र अशोकराव माने व शब्दगंध साहित्य परिषदेचे अध्यक्ष पृथ्वीराज यादव यादव यांनी दिली.

श्री. माने व यादव म्हणाले, ''संमेलनाचे उद्‌घाटन गोकुळ दूध संघाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते व अपर पोलिस उपाधीक्षक जयश्री गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात होणार आहे. कथाकार विजय जाधव यांच्या कथाकथन कार्यक्रम होईल. दुपारी चार वाजता निमंत्रित कवींचे संमेलन आणि सायंकाळी पाच वाजता स्थानिक कविचा कवी कट्टा भरणार आहे. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर मास्क व प्रतिबंधक नियमांचे पालन करून हे साहित्य संमेलन होणार आहे, अशी माहिती माने व यादव यांनी दिली. या वेळी प्रवीण माने, दगडू माने, निळकंठ फल्ले, बाळासो कोळी आदी उपस्थित होते. दरम्यान, भाई दिनकररावजी यादव जिल्हास्तरीय क्रीडा पुरस्कार, पेठवडगावची राष्ट्रीय हॉकी खेळाडू सुष्मिता पाटील हिला जाहीर झाला आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार तिला प्रदान करण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ कादंबरीकार, लेखक, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते इनामदार यांनी सामाजिक, पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल त्यांना जीवनगौरव पुरस्कार देण्यात येणार आहे.

पुढारी



कोल्हापूर : आंतरविभागीय हँडबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावणारा न्यू कॉलेजचा संघ.

# आंतरविभागीय हँडबॉल स्पर्धेत न्यू कॉलेजला विजेतपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हँडबॉल स्पर्धेत न्यू कॉलेजने अंतिम सामन्यात डी. आर. माने कॉलेजवर १९ विरुद्ध ०९ फरकाने विजय मिळवत विजेतेपदावर मोहर उमटवली. त्यापूर्वी उपांत्य व लीग सामन्यात न्यू कॉलेजने इस्लामपूरच्या वाय. सी. महाविद्यालयावर १८ विरुद्ध ११ व पलूसच्या एस.सी.एस. महाविद्यालयावर १३ विरुद्ध ०५ अशा एकतर्फी विजय मिळवला. विजेत्या संघात साहिल करले, अभिजित लोहार, रजत पाटील, श्रीधर पाटील, गणेश मछले, सुशांत साळवी, अमन शेख, ओंकार रुमाले, ओंकार आमते, विनायक पाटील, सुभाष चौगले, अवधूत पाटील, प्रथमेश पाटील, तेजस शिंगे, संकेत लाड, रुद्र जाधव यांचा सहभाग आहे. सर्व खेळाडूंना संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, क्रीडा प्रमुख अमर सासने, प्रदीप साळोखे, संदीप पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.